# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली दिनांक१८/०२/२०१९

**सी-60 जवानांकरिता अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज 'शक्तीगड' या व्यायामशाळेचे मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन**

नक्षलवाद्यांविरोधात मोठी भुमीका पार पाडणाऱ्या गडचिरोली जिल्हा पोलीस दलातील सी-60 जवानांकरीता अत्याधुनीक व्यायामाच्या उपकरणांनी सुसज्ज 'शक्तीगड' या व्यायामशाळेचे उद्‌घाटन आज दिनांक १८/०२/२०१९ रोजी सी-60 कार्यालय गडचिरोली येथे मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शुभहस्ते पार पाडले. या व्यायामशाळेचा उद्‌घाटन समारंभ मा. श्री. नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री, रस्ते व वाहतुक भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. या प्रसंगी मा. श्री. शैलेश बलकवडे पोलीस अधिक्षक, गडचिरोली, मा. श्री. महेंद्र पंडित अपर पोलीस अधिक्षक, (प्रशासन) गडचिरोली, डॉ. श्री. मोहीत गर्ग अपर पोलीस अधिक्षक, (नक्षल) गडचिरोली तसेच इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नक्षलविरोधी अभियान राबविणाऱ्या सी-60 जवानांना या अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज व्यायामशाळेमुळे त्यांची शारिरीक सक्षमता वाढविण्यास नक्कीच फायदा होईल व जवानांचे मनोबल उंचावेल असा आत्माविश्वास उद्‌घाटनप्रसंगी जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांनी व्यक्त केला.


गडचिरोली पोलीस दल
''शक्तीगड''
60 व्यायामशाळा उद्घाटन समारंभ
मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस